क्रमांक पोआ/ कक्ष- ३/ /विविक्षित कामे/ /२०२०

**पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय,**
**डॉ. दा.नौ. मार्ग, महात्मा फुले मंडई समोर, मुंबई - ०१**

**करार पद्धतीने नियुक्ती करण्याबाबत.....**

पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई अंतर्गत विशेष शाखा-१, गु.अ.वि., मुंबई ही सामाजिक, राजकीय, जातीय, धार्मिक, आर्थिक घडामोडींबाबत गुप्तवार्ता संकलनाचे काम करीत असते. धार्मिक कट्टरता व जागतिक दहशतवाद तसेच डाव्या विचारसरणीच्या विविध संघटनांच्या वाढत्या हालचालींच्या पार्श्वभूमीवर सदर शाखेस उपलब्ध झालेल्या माहितीचे योग्य विश्लेषण करण्याकरीता पोलीस विभागामधून सेवानिवृत्त झालेल्या परंतू काम करण्यास सक्षम असलेल्या पोलीस निरीक्षक / वरिष्ठ पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांची गुप्तवार्ता विश्लेषण कक्ष येथे एक वर्षाच्या मुदतीच्या करारावर नियुक्ती होणे आवश्यक आहे.

**त्यासाठी विशेष शाखा, बृहन्मुंबई येथे साधारण २ वर्षे नियुक्ती असलेले, बृहन्मुंबईतील अल्पसंख्यांक विशेषतः इस्लाम धर्माविषयीचे ज्ञान, मोहल्ला समितीची कार्यपद्धती व जनसंपर्क, कायद्याचे सखोल ज्ञान तसेच सामाजिक व चालू घडामोडींबाबतची माहिती असलेले सेवानिवृत्त परंतू शारीरिक व मानसिक दृष्टया** सक्षम असलेल्या व्यक्तींचे अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर कामकाजासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना व नियुक्तीच्या अटी/ शर्ती व इतर तपशिल बृहन्मुंबई पोलीस दलाच्या **www.mumbaipolice.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. तरी अर्हताप्राप्त इच्छुकांनी त्यांचे अर्ज ही जाहीरात प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांच्या आत पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयास (कक्ष- ३ (व.आ.) ला लक्षवेध करून) सादर करावेत.

(नवल बजाज)
सह पोलीस आयुक्त (प्रशासन),
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय,
मुंबई

# <u>अर्जाचा नमुना</u>

विशेष शाखा-१, बृहन्मुंबई येथील गुप्तवार्ता विश्लेषण कक्ष येथे ''**गुप्तवार्ता अधिकारी**'' म्हणून नियुक्ती करण्याकरीता अर्ज.

| उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत: चे छायाचित्र येथे चिटकवावे |
|---|

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव

२. अर्जदाराच्या निवासाचा पत्ता

३. सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम

४. भ्रमणध्वनी क्रमांक

५. जन्मदिनांक व वय

६. पदासाठी विहीत केलेली अर्हता अर्जदाराकडे आहे काय

७. मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान आहे का

८. विभागीय चौकशी/ शिक्षा चालू किंवा प्रस्तावित आहे का

९. अनुभव/ इतर प्राविण्य इ.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या कार्यालयात सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची ''**गुप्तवार्ता अधिकारी**'' या पदी करार पद्धतीने नियुक्ती करावयाची जाहिरात व **<u>www.mumbaipolice.maharashtra.gov.in</u>** या संकेतस्थळावरील माहिती, सूचना तसेच अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :- अर्जदाराची स्वाक्षरी